महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Email id :mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/६६०८
दिनांक : २२/१२/२०२०

# आदेश

विषय:- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश-लॉकडाऊन टप्प्याटप्प्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणेबाबत (मिशन बिगिन अगेन).

संदर्भ :- १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५

३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७

४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1/दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, , १४ ऑक्टोबर २०२०, २३ ऑक्टोबर २०२०,२९ ऑक्टोबर २०२०,३ नोव्हेंबर २०२०,१४ नोव्हेंबर २०२०, २३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०, २१ डिसेंबर २०२०

५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०

६) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९३३, दि.०१.०८.२०२०

७) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९३४, दि.०३.०८.२०२०

८) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९६४, दि.०४.०८.२०२०

९) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/३३६१, दि.१७.०८.२०२०

१०) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/३७९१, दि.०२.०९.२०२०

११) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/४६१५, दि.०१.१०.२०२०

१२) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/४६२३, दि.०४.१०.२०२०

१३) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/४८२३, दि.०९.१०.२०२०

१४) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/४८७४, दि.१३.१०.२०२०

१५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/५१३५, दि.२१.१०.२०२०

१६) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/५१९६, दि.२४.१०.२०२०

१७) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/५३४२, दि.२९.१०.२०२०

१८) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/५३४५, दि.३१.१०.२०२०

१९) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/५४६७, दि.०५.११.२०२०

१९) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/५६४३, दि.१९.११.२०२०

२०) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/५३९५, दि.२१.११.२०२०

२१) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/५९४७, दि.०१.१२.२०२०

ज्याअर्थी, कोविड-१९ या आजारास जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक महामारी (Pandemic ) घोषीत केले आहे. तसेच, उपरोक्त संदर्भाकित अधिसुचनेनूसार महाराष्ट्र राज्यामध्ये अधिसुचनेच्या दिनांकापासून साथरोग अधिनियम, १८९७ ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ अन्वये कोविड-१९ विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजनांतर्गत दिनांक २२/१२/२०२० ते ०५/०१/२०२१ या कालावधीत रात्री ११.०० ते सकाळी ०६.०० पर्यंत महानगरपालिका हद्दीत संचार बंदी लागू करण्या संदर्भात आदेश पारित केले आहेत.

ज्याअर्थी, सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड -१९ उपाययोजना नियम -२०२० अंमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे** महानगरपालिका, पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१) पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक कारण/ सेवा वगळता दिनांक २२ डिसेंबर ते ५ जानेवारी २०२१ या कालावधीमध्ये रात्री ११.०० ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत घराबाहेर जाता येणार नाही.

२) वय वर्ष ६५ वयोगटापेक्षा अधिक वय असलेल्या, आजारी व्यक्ती, गरोदर महिला, १० वर्षापेक्षा वय कमी असलेली मुले यांना आत्यावश्यक सेवा आणि आरोग्य विषयक अडचणी शिवाय घराबाहेर जाता येणार नाही.

३) जीवनावश्यक वस्तूंचा (दुध,भाजीपाला,फळे इ.) व अत्यावश्यक सेवा पुरवणारे कार्यालय / व्यक्तींना व त्यांच्या वाहनांना या आदेशातून वगळण्यात येत आहे.

४) सदर आदेशान्वये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नियुक्त अधिकारी / कर्मचारी तसेच पुणे महानगरपालिकेतील कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे काम करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी व वाहने तसेच शासकीय व सेवा देण्यात येणाऱ्या वाहनांना सदर आदेशातून वगळण्यात येत आहे.

५) जीवनावश्यक व अत्यावश्यक वस्तूंची मालवाहतूक सेवा देणाऱ्या वाहनांना सदर आदेशातून वगळण्यात येत आहे.

६) ज्या उद्योगांचे शिफ्टमध्ये कामकाज चालते अशा संबंधित आस्थापनेवरील कर्मचा-यांना व त्यांची ने- आण करणाऱ्या वाहनांना सदर आदेशातून वगळण्यात येत आहे.

७) वर्तमानपत्रांची वाहतूक करणारी वाहने व वितरण करणारे कर्मचारी यांना सदर आदेशातून वगळण्यात येत आहे.

८) विमान व रेल्वेप्रवास करणारे आगाऊ बुकिंग असणारे प्रवासी सदर आदेशातून वगळण्यात येत आहे.

९) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

१०) पुणे महानगरपालिकेने यापूर्वी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि. २२/१२/२०२० पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक २२/१२/२०२० रोजी दिलेला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA
पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन-१९५०
EST.1950

**स्वाक्षरी/ XXX**
**(विक्रम कुमार)**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका**

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

निर्गमित

Rubal 22/12/2020

( रुबल अग्रवाल )
अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज)
पुणे महानगरपालिका